जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2019
तरुण भारत

# प्रा. जयंत आसगावकर यांना शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान



कुडीत्रे : सांगरूळ शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. जयंत आसगावकर यांना सपत्नीक शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करताना प. पू. परमात्मराज महाराज, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शेखर चरेगावकर, सर्जेराव लाड, दादा लाड.

प्रतिनिधी
वाकरे

सांगरूळ शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी प्रा. जयंत आसगावकर यांना स्वाभिमानी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक सेवाभावी शिक्षक संघाच्यावतीने त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याची नोंद घेऊन त्यांना शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प. पू. परमात्मराज महाराज (आडी मठ) आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ .देवानंद शिंदे यांच्या हस्ते एका खास कार्यक्रमात पुरस्कार वितरण करण्यात आले.

प्रा. आसगावकर १९८९ पासून श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कुडीत्रेच्या व्होकेशनल विभागात विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्याचबरोबर गेली १२ वर्षे ते सांगरूळ शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी म्हणून काम पाहत आहेत. या संस्थेच्या १७ शाखामध्ये ३०० कर्मचारी सेवेत असून ८००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर ते कोल्हापूर जिल्हा शिक्षण संस्था चालक संघटनेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी कोल्हापूर जिल्हा माध्यमिक, उच्च माध्यमिक बोर्डाचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. संस्थेची जबाबदारी सांभाळत ते आपली सेवा बजावत आहेत. त्यांच्या शिक्षक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार सन्मानपूर्ण देण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर, शिक्षण उपसंचालक सुरेश आवारी, शिक्षक नेते दादा लाड, सर्जेराव लाड, राजाराम वरुटे, प्राथमिक शिक्षणाधिकारी आशा उबाळे, अध्यक्ष सुधाकर निर्मळे, संस्थेचे अध्यक्ष यशवंत खाडे, उपाध्यक्ष के. ना. जाधव उपस्थित होते.

NOTE 5 PRO
AI CAMERA



# कुंभार समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

कोल्हापूर टाइम्स टीम

पन्हाळा-बावडा तालुका कुंभार समाज संघ व कुंभश्री मासिकाच्यावतीने पन्हाळा-बावडा तालुका व कोल्हापूर शहरातील १० वी व १२ वीमध्ये उत्तुंग यश मिळविणाच्या विद्यार्थ्यांना कुंभश्री सन्मानपत्र व कुंभश्री शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम ए. बी. फाउंडेशन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील हॉलमध्ये झाला.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा एम.व्ही. कुंभार यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात डॉ. शिर्के यांच्या हस्ते ३० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ हजार रुपयांची शिष्यवृत्ती, सन्मानपत्र देऊन गौरव केला जात असल्याचे कुंभश्री मासिकाचे जिल्हा प्रतिनिधी अरविंद राणे यांनी प्रास्ताविकात सांगितले. गुणवंत विद्यार्थ्यांना कुंभश्री मासिकातर्फे सन्मानपत्र व शिष्यवृत्तीचे चेक देण्यात आले. ए. बी. फाउंडेशनचे संचालक ज्ञानदेव भोपळे, दीपक अतिग्रे उपस्थित होते.

3 JUN 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बारावीनंतर करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध

## शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : कुंभश्री मासिक सन्मानपत्रच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

बारावी शिक्षणानंतर पारंपारिक पदवी शिक्षणाबरोबर बँकींग, हॉटेल मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग, वैद्यकीय शिक्षणातही अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी मात्र आवडीनुसार कौशल्यावर आधारीत शिक्षण निवडून, त्यात करिअर करावे, असा सल्ला शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

पन्हाळा-बावडा तालुका कुंभार समाज संघ व कुंभश्री मासिक सन्मानपत्रच्या वतीने आयोजित गुणवंतांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम ए. बी. फौंडेशनच्या हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला.अध्यक्षस्थानी रामचंद्र कुंभार होते.




कोल्हापूर : पन्हाळा-बावडा तालुका कुंभार समाज संघ व कुंभश्री मासिक सन्मानपत्रच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांबरोबर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत ज्ञानदेव भोपळे , दीपक अतिग्रे, अरविंद राणे आदी.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपली यशाची परंपरा कायम ठेवण्यासाठी त्यांनी निवडलेल्या क्षेत्रात यश मिळवणे आवश्यक आहे. कौशल्यावर आधारीत शिक्षण घेवून नोकरीच्या संधी शोधल्या पाहिजेत. तसेच पदवी पदव्युत्तर शिक्षण घेऊन शिक्षण घेवून संशोधन क्षेत्रात नाव कमवता येते. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी होण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात आत्मविश्वासाने अभ्यास केला पाहिजे.

विद्यार्थ्यांना २ लाख ७० हजार रूपयांची शिष्यवृत्ती मंजूर करून ३० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ हजार रूपयांची शिष्यवृत्ती दिली. समाजातील ६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४० हजार बिनव्याजी शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती देण्यात आली. गुणगौरव कार्यक्रमात ए. बी. फाऊंडेशनचे संचालक ज्ञानदेव भोपळे व दीपक अतिग्रे त्यांच्या मुलींनी बारावी परीक्षेत यश मिळवल्याबद्दल ऋतुजा भोपळे व देविका अतिग्रे यांचा सत्कार करण्यात आला. अरविंद राणे यांनी स्वागत व आभार मानले. यावेळी विक्रम कुंभार, सागर कुंभार, राजाराम कुंभार, वसंत कुंभार, भगवान कुंभार, भिकाजी कुंभार, आदिनाथ कुंभार, व पन्हाळा बावडा तालुका कुंभार समाज संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.